अल्पबचत संचालनालय बंद करण्यात आल्यामुळे महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवर पदे वर्ग करणे, रूपांतरीत करणे, रिक्त पदे भरणे तसेच अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः मरालॉ-२०१७/प्र.क्र.१६८/लॉटरी-३.

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर,मुंबई -३२.
दिनांक : १९ डिसेंबर, २०१७

पहा - वित्त विभाग, अल्पबचत संचालनालय, शासन निर्णय क्र. समावे २०१५/ प्र.क्र.७७/१५/अबप्र, दि.२६ ऑक्टोंबर,२०१७.

प्रस्तावना :

दिनांक १०/१०/२०१७ रोजी मंत्रीमंडळ बैठकीत वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अल्पबचत संचालनालय, तेथील कामकाज कमी झाल्याने दि.०१ नोव्हेबर, २०१७ पासून कायमस्वरूपी बंद करण्यास आणि संचालनालयाकडे सध्या असलेले एजन्सी नुतनीकरणाचे कामकाज महसूल विभागाच्या आस्थापनेवरील संबंधित जिल्हयांच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्याचा मंत्रीमंडळाने निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे दिनांक २६/१०/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार व उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवरील काही कार्यरत अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवर समावेशन करण्याकरीता, अल्पबचत संचालनालयाचे पद वर्ग करणे,काही पदे रूपांतरीत करणे व लॉटरीच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरणे आणि अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार दिनांक २६/१०/२०१७ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे अल्पबचत संचालनालय दिनांक ०१ नोव्हेंबर,२०१७ पासून बंद करण्यात आल्याने, अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवरील सातव्या वेतन आयोगानुसार रु.१,४४,२००/- वेतनश्रेणीतील आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी हे पद महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवर आयुक्त, राज्य लॉटरी या पदनामाने अस्थायी पद म्हणून वर्ग करण्यात येत आहे.

२. उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यातील रकाना २ येथे नमूद ०५ पदे महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवर पदनामांच्या बदलासह खालील तक्त्यातील रकाना ४ येथील नमूद ०५ अस्थायी पदांमध्ये रुपांतरीत करण्यात येत आहेत.

अ क्र	अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवरील पद	वेतन श्रेणी	रूपांतरीत पदाचे पदनाम	रुपांतरीत पदाची वेतनश्रेणी	रुपांतरीत पदांची संख्या
१	२	३	४	५	६
१	सहायक संचालक, अल्पबचत (गट ब, राजपत्रित)	वेतन बँड रू.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रू.४४००	राज्य लॉटरी अधिकारी (गट ब, राजपत्रित)	वेतन बँड रू.९३००-३४,८०० अधिक ग्रेड वेतन रू.४४००	०१
२	अल्पबचत अधिकारी (गट-ब अराजपत्रित)	वेतन बँड रू.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रू.४३००.	सहायक राज्य लॉटरी अधिकारी (गट ब, अराजपत्रित)	वेतनबँड रू.९३००-३४,८०० अधिक ग्रेडवेतनरू.४३००.	०३
३	लघु लेखक (उच्च श्रेणी) (गट-ब अराजपत्रित)	वेतन बँड रू.९३००-३४,८०० अधिक ग्रेड वेतन रू.४४००.	लघु लेखक (उच्च श्रेणी)	वेतनबँड रू.९३००-३४,८०० अधिक ग्रेड वेतन रू.४४००.	०१
				एकूण रुपांतरीत पदे	०५

३. महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांपैकी सध्या रिक्त असलेली पुढील ०७ अस्थायी पदे, अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवरील समकक्ष पदांवरील कर्मचाऱ्यांच्या बदलीने/समावेशनाने भरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
१	सहायक कक्ष अधिकारी	रु.९३००-३४८००+ग्रेड पे ४३००	०१
२	लिपिक-टंकलेखक	रु.५२००-२०२००+ग्रेड पे १९००	०१
३	वाहन चालक	रु.५२००-२०२००+ग्रेड पे १९००	०१
४	शिपाई	रु.५२००-२०२००+ग्रेड पे १३००	०४
		एकूण	०७

४. मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार, अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवर सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे अन्यत्र समावेशन होईपर्यंत किंवा अन्य विभागातील कर्मचाऱ्यांना, आयुक्त, राज्य लॉटरी यांच्याकडून कार्यमुक्त करण्यात येईपर्यंत किंवा ३ महिने कालावधीसाठी, यापैकी जे प्रथम घडेल तोपर्यंत, पुढील प्रमाणे २० अधिसंख्य पदे महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहेत.

अ. क्र.	**महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिसंख्य पदे**	**सध्याची वेतनश्रेणी**	**अधिसंख्य पदे**
१.	राज्य लॉटरी अधिकारी , गट-ब (राजपत्रित)	वेतन बँड रू.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रू.४४००	०१
२	सहायक राज्य लॉटरी अधिकारी , गट-ब (अराजपत्रित)	वेतन बँड रू.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रू.४३००	१७
३	लघुलेखक (निम्न श्रेणी), गट-ब (अराजपत्रित)	वेतन बँड रू.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रू. ४३००	०१
४	लेखा अधिकारी,गट-ब (राजपत्रित)	रू. ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रू. ४६००	०१
		एकूण पदे	२०

५. उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवरील मंजूर १०८ पदे व १ अधिसंख्य पद अशा एकूण १०९ पदांपैकी १०३ पदे रद्द करण्यात येत आहेत.

६. वरीलप्रमाणे वर्ग करण्यात आलेले पद, रूपांतरीत पदे व त्या पदांवरील पदस्थापना, रिक्त पदांवरील बदलीने/समावेशनाने पदस्थापना आणि अधिसंख्य पदांवरील पदस्थापना हया महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवरील अस्थायी पदांवर,पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि.०१/११/२०१७ पासून करण्यात येत आहेत.

७. उपरोक्त पदांसाठी वेतन व भत्त्यावरील होणारा खर्च महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाचे वित्त विभाग, मागणी क्र.जी-२, मुख्य लेखशिर्ष २०७०-इतर प्रशासकीय सेवा, ००१-राज्य लॉटरी,(०१) (०१) लॉटरी संचालनालय, २०७०००३६१, वेतन-०१ उद्दीष्टाखाली चालू वर्षाच्या उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात येईल.

८. वरील परिच्छेद २ प्रमाणे रुपांतरीत करण्यात आलेल्या पदांमुळे महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात झालेला बदल यथावकाश सुधारित करण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय, मंत्रीमंडळाच्या दिनांक १०/१०/२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार आणि उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक २६/१०/२०१७ रोजी झालेल्या क्र.०४/२०१७ च्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७१२१९१७१७१५१५०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Madhav Kundalik Avhad

Digitally signed by Madhav Kundalik Avhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=33f159af855e668523427acf7322c4c3427aed8bf6b0bf7eb4dfdd5490c3d843, cn=Madhav Kundalik Avhad
Date: 2017.12.20 12:07:13 +05'30'

(माधव आव्हाड)
कक्ष अधिकारी तथा राज्य लॉटरी अधिकारी,
वित्त विभाग.

प्रति,

१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राज भवन, मलबार हिल,
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (महसूल),यांचे खाजग सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (ले. व को.), मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (व्यय), मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई.
१२. आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी.

१३. उपसचिव (लॉटरी /आस्थापना/अर्थसंकल्प/प्रशासन-१,४/आकृतीबंध)
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई.
१५. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय,मुंबई.
१६. लेखाधिकारी (लॉटरी), महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय,मुंबई.
१७. सर्व सहायक संचालक / अल्पबचत अधिकारी.
१८. महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर .
१९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई .
२०. सर्व जिल्हा कोषागार कार्यालये.
२१. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई .
२२. निवड नस्ती, लॉटरी-३.